नाशिक जिल्हा परिषद नाशिक सामान्य प्रशासन विभाग, दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५९१०१०

जाक्र/साप्रवि/भांडार/७८१ते८९५/२०१७
नाशिक दिनांक:- १५/०८/२०१७

प्रति,

१) प्रकल्प संचालक,जि.ग्रा.वि.यं.नाशिक
२) खाते प्रमुख -------------(सर्व)
जिल्हा परिषद नाशिक

विषय :- विकास कामांचे ई-निवीदा प्रक्रिये नंतर कार्यारंभ आदेश संबंधीत पंचायत समिती स्तरावर अवगत करणे बाबत.

माझे असे निदर्शनास आले आहे जिल्हा परिषद अधिनस्त अनेक विभागाकडुन विकास कामे, खरेदी प्रक्रिया इत्यादी संदर्भात शासन निर्णय तरतुदी नुसार ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येते ई-निविदा प्रक्रियेनंतर निकषानुसार पात्र पुरवठाधारक/मक्तेदार यांना कार्यारंभ आदेश निर्गमित केले जातात. परंतु कार्यारंभ आदेश ज्या तालुका स्तरावरील संबंधीत असतात अशा तालुक्यातील गट विकास अधिकारी अथवा ग्रामपंचायतशी संबधीत असल्यास संबंधीत ग्रामपंचायतीस आदेशाच्या प्रती अग्रषित केल्या जात नाही त्यामुळे पंचायत समिती स्तरावर अथवा ग्रामपंचायत स्तरावर प्रस्तावित नविन कामाबाबत ग्रामिण जनतेला अथवा तालुका स्तरावरील लोक प्रतिनिधी यांना माहिती होत नाही.

यापुढे जिल्हास्तरावरून आपले विभागाशी अधिनस्त कार्यारंभ आदेश ज्या पंचायत समिती विभागाशी अथवा ग्रामपंचायत स्तरावरील असतील अशा सर्व संबंधीत यंत्रणेस कार्यारंभ आदेशाची प्रत अग्रेषित करून पोहोच करण्याची जबाबदारी आपली राहणार आहे. याची नोंद घ्यावी. असे कार्यांरंभ आदेश संबंधीत यंत्रणेस अग्रेषित करून पोहोच न झाल्याची बाब निदर्शनास आल्यास संबंधीत संकलनास व आपणास सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल.

Deepak
15/08

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नाशिक

प्रत :- अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांना माहितीस्तव
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती----------------(सर्व) यांना पुढील कार्यवाहीसाठी